# -: श्री. दिलीप गुरव यांचा परिचय :-

**नांव** : दिलीप महादेव गुरव

**पत्ता**

**निवास** : पुजा कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं. ५, शिलानगर, कराड, जि. सातारा

**ऑफीस** : मुख्य कार्यकारी अधिकारी,
दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि. कराड (शेड्यूल्ड बँक)
मुख्य कार्यालय : ५१६/२, शनिवार पेठ कराड ४१५ ११०.

**फोन** **निवास** : २२५३९५

**ऑफीस** : २२१४८१, २२६०१३, २२६०१७

**मोबाईल** : ९८२२३ ९४८०३

**वेब साईट** : www.karadurbanbank.com

**इ-मेल** : ceo@ karadurbanbank.com

**फॅक्स** : (०२१६४) २२०१२६

**जन्मस्थळ व तारीख:** वेळेकामथी, ता.व जि.सातारा
दि.१ मार्च १९६५.

**शिक्षण** : बी. कॉम., एफ. सी. ए.

प्राथमिक शिक्षण वेळेकामथी येथे तर माध्यमिक शिक्षण सातारा येथील अनंत इंग्लिश स्कूल येथे झाले. बी. कॉम. सातारा येथे झाले. बी. कॉम चे शिक्षण पूर्ण करीत असतानाच सातारा येथील रजनी क्लासेसचे संचालक श्री. विश्रांत कदम यांचे सतत प्रोत्साहन व सहकार्यामुळे सातारा येथील मे. जे. बी. चव्हाण आणि कंपनी, सी. ए. यांचेकडे आर्टीकलशीप पूर्ण केली. झावरे क्लासेस पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करता आले.

**करिअरची सुरूवात**

१९९४ मध्ये त्यांनी सातारा येथील मे. जे. बी. चव्हाण, सी. ए. यांच्या फर्मसोबत प्रॅक्टीसला सुरूवात केली. हे प्रॅक्टीस सुरू असतानाच विविध महाविद्यालयातून मानद प्राध्यापक म्हणून कामकाज केले. सी. ए. पूर्ण केल्यानंतर त्यांनी राष्ट्रीयकृत बँका, खाजगी क्षेत्रातील बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका व संस्था, विद्यापीठे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे लेखापरिक्षण केले.

**कराड अर्बन बँकेत सेवेची सुरूवात**

कराड अर्बन बँकेच्या सेवेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर १९९६ मध्ये रूजू. बँकेच्या सेवेत आल्यानंतर ऑडीट व अकौंट विभागाकडे काम पाहीले. बँकेच्या कामकाजात गतीमानता आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशी संबंधीत सर्व बाबतीत काटेकोरपणे कामकाज करून कामकाजाची वेगळी छाप निर्माण केली. रिझर्व्ह बँकेच्या विविध संकल्पना चांगल्या पध्दतीने राबविल्या.

**प्रशिक्षणाच्या संधी**

नोकरीच्या कालखंडात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान, नागपूर, बर्ड संस्था, लखनौ, वैकुंठराव मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे, यशदा पुणे इत्यादी ठिकाणी बँकींगविषयक विविध प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. 'बँकॉन' या बँकींग क्षेत्रातील कलकत्ता व दिल्ली येथे संपन्न झालेल्या परिषदेत कराड अर्बन बँकेचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली.

**मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती**

दि कराड अर्बन को ऑपरेटीव्ह बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी जुलै २००५ पासून नियुक्ती झाली. अतिशय कमी वयात त्यांना हे मानाचे पद प्राप्त झाले.

भारतीय जीवन बीमा निगम (LIC) Pollicyholder's Council वर सदस्य म्हणून नियुक्ती.

कराड अर्बन बझारच्या संचालक मंडळावर नियुक्ती.

सन २००८ मध्ये कोल्हापूर जिल्हा ना.बँक्स असो. लि. कोल्हापूर यांचेतर्फे सर्वोत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पुरस्काराने सन्मानित.

**स्फूर्तीदायक व्यक्ती**

स्व.डॉ. द. शि. एरम व सुभाषराव जोशी यांचा यांचे जीवनावर बराच प्रभाव आहे.

**सामाजिक कार्य**

शिवस्फुर्ती क्रीडा मंडळ वेळे या मंडळाची स्थापना. या मंडळाचे गेल्या १० वर्षापासून संस्थापक अध्यक्ष. मंडळामार्फत व्यसनमुक्ती, क्रीडा स्पर्धा व विविध सामाजिक उपक्रम राबविले.

***